# सायबर गुन्हे रोखण्यासाठी बैठक संपन्न



**सांगली : हॅलो प्रभात**

सायबर गुन्हे रोखण्यासाठी मराठा छावणी व क्विक हिल फौंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आज विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले.

सध्या सायबर जगात घडत असलेली सायबर गुन्हेगारी वाढत असून निरपराध लोक याला बळी पडत आहेत. गुन्हेगार नुसतेच खात्यामधून पैसे काढत नाहीत तर आता नवनव्या ब्लॅक मेल करण्याच्या पद्धती अवलंबल्या जत आहेत. ज्या मध्ये बळी ठरलेल्या व्यक्तीसह त्याचे कुटुंब, इष्ट मित्र हे सुध्दा टार्गेट केले जात आहेत. सायबर फसवणूक आणि गुन्हेगारी वाढत असून याला आळा कसा घालावा हे जनसामान्य लोकांना माहीत नाही.त्यासाठी क्विक हिल फाउंडेशन या समाज सेवी संस्थेने, सायबर सुरक्षा जागरूकता लोकांपर्यंत पोहचावी, यासाठी उत्तम मार्गदर्शिका तयार केली असून यामध्ये विविध सायबर घोटाळे कसे घडतात आणि घडलेच तर स्वतःला सुरक्षित कसे करायचे आणि कुठे व कशी तक्रार नोंदवावी हे अतिशय सोप्या भाषेत नमूद केले आहे. ही मार्गदर्शक माहीती कॉलेज, शाळा, विविध संस्थाना एकत्रित करुन समाजातील सर्वच लोकांपर्यंत पोहचविली जाणार आहे, अशी माहीती क्विक हिल फौंडेशनच्या विभागीय समन्वयक सौ. गायत्री पवार-केतकर यांनी बैठकीत दिली.

या वेळी श्रीकांत शिंदे, संगिता मोरे, सर्जेराव पाटील, संजय कोरे, सचिन सगरे, विवेक पवार, अँड. अवधूत देशपांडे, सुयोग हावळ, ओंकार पाटणे, अँड.विकास गोसावी, अँड.योगेश नाडकर्णी आदि उपस्थित होते.